भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2026 ◑ EY 965385

- 2 JUL 2026

अनु.क्र. 93346 दि. ........ मु.शु.रक्कम 500

दस्ताचा प्रकार ........ हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ........

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता ........ आरिफ कुजलानी सिंकोणा माधव ठवे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव ........ PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता ........ कन्हैया पचूरवि

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

राहुल एस. नाईक
परवाना क्र. २२०११२१
१४५, गुरुवार पेठ, पुणे-४२.

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी
पुणे

19 JUN 2026

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
SUDHIR MADHUKAR NIRPHARAKE
PUNE
Regd.No.891
Exp. Date 12/01/2028
GOVT. OF MAHARASHTRA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY
SUDHIR MADHUKAR NIRPHARAKE
PUNE
Regd.No.891
Exp. Date 12/01/2028
MAHARASHTRA

# हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक :       /       /२०२६ इसवी ते दिवशी. मी/आम्ही **ए टू ओ हॉटेल्स अँड रिसॉर्टर्स एलएलपी तर्फे पार्टनर श्री. आरिफ फजलानी, पत्ता- C/O, सोपारीवाला** एक्स्पोर्टस, २१वा मजला, **नरीमन पाईंट, मुंबई ,** जिल्हा: **मुंबई, ४०००२१.**

सत्य प्रतिज्ञेवर असे प्रतिज्ञापत्र करून देतो की, मौजे **: तिकोना** , तालुका:- **मावळ**, जिल्हा: **पुणे, गट नं. – ४१८ पै , ४२१, ४२३, ४२४ पै, ४२५, ४२६ पै , ४२७ पै,४२८,४३५ पै पुणे यांसी एकूण क्षेत्र ५४०३०.०० चौ.मी.** या मिळकतीमध्ये निवासी / बिगर निवासी पद्धतीच्या प्लॉट चे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यार पत्रधारक म्हणून मी / आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही याची माहिती मला / आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोरव्दारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरव्दारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत वत्या संबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S.& D.A) या कार्यलयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारमार्फत सदर जागीपाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे आमच्यावर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची जबाबदारी मी / आम्ही या हमीपत्राद्वारे स्वीकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फतकोणताही पाणीपुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणीपुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतर सुदधा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंग नंतर नियोजित गाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत फ्लॅट धारकच्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची माझी / आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत ला तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनूसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल. याची मी / आम्ही काळजी घेईन / घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी / आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक/ प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींचा लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेईन / घेऊ.

७) हे हमीपत्र माझे / आमचे वालीवारसांवार बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉट मधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी/आम्ही राजीखुशीने दिनांकः / /२०२६ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांक : / /२०२६

( हमीपत्र लिहून देणार )

ए टू ओ हॉटेल्स अँड रिसॉर्टर्स एलएलपी तर्फे

श्री. पार्टनर आरिफ फजलानी

NOTARY SUDHIR MADHUKAR NIRPHARAKE PUNE Regd.No.891 Exp. Date 12/01/2028 GOVT. OF MAHARASHTRA

BEFORE ME

S. M. NIRPHARAKE
NOTARY STATE OF MAHARASHTRA
PUNE

Noted and Registered
at Sr. No. 1470/26
Date: 2 JUL 2026